नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १७९ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. ०५ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### 'मिथेनॉल' कंपन्यावर मुंढेंची वक्रदृष्टी

मुंबई (स. गांवकरी) : 'मिस्टर क्लीन' म्हणून ओळख असलेले अन्न व औषध प्रशासनाचे नवनियुक्त आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आता राज्यातील मिथेनॉल उत्पादक कंपन्यांकडे मोर्चा वळवला आहे. मिथेनॉल हातभट्टीमध्ये विक्री करण्यासाठी राज्यात मुक्तपणे विक्री होवू लागल्याने मुंढे यांनी मिथेनॉल उत्पादकांच्या झाडाझडतीला प्रारंभ केल्याने बड्या कंपन्या धास्तावल्या आहेत. दारुमध्ये इथेनॉल असते. मात्र ते जिवीतास विशेष हानीकारक नाही. मिथेनॉल आणि इथेनॉल सारखे दिसतात. मिथेनॉल हे विषारी द्रव्य असून ते औषधे, रंग, सौंदर्य प्रसाधने, रॉकेट इंधन आदींसाठी वापरले जाते. महाराष्ट्रात ८३७ मिथेनॉल उत्पादक कंपन्या आहेत. महाराष्ट्र विष कायदा १९७२ नुसार मिथेनॉलचा साठा, विक्री यासंदर्भात सुनिश्चित पद्धती (SOP) आहे. मात्र त्याला हारताळ फासत मिथेनॉलची राज्यात ऑनलाईन विक्री होत होती. त्यातून नुकतेच पुणे जिल्ह्यात विषारी दारु दुर्घटना घडून २४ बळी गेले आहेत.

### शिक्षण मंत्र्यांनी शिक्षण व्यवस्थेची वाट लावली

नवी दिल्ली (स. गांवकरी) : जेईई अँडव्हान्स्ड विद्यार्थ्यांचा डेटा लीक झाल्याप्रकरणी कॉक्रोच जनता पार्टीने गुरुवारी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला. शिक्षणमंत्री पूर्णपणे अकार्यक्षम आहेत. त्यांनी देशाच्या शिक्षण व्यवस्थेची वाट लावली. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी 'कॉजपा'ने केली. शिक्षण क्षेत्रात जबाबदारी सुनिश्चित करण्यात प्रधान पूर्णपणे अपयशी ठरले आहेत, असा आरोप कॉक्रोच जनता पार्टीच्या प्रवक्त्यांनी दिल्लीतील पत्रकार परिषदेत केला. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या डेटाच्या सुरक्षेबाबत आणि परीक्षा व्यवस्थापनाच्या सरकारच्या पद्धतींबाबत पुन्हा एकदा गंभीर चिंता निर्माण झाल्या आहेत, असे ते म्हणाले.

### शालेय वस्तुंची खरेदीत काँग्रेसला मिरच्या

मुंबई (स. गांवकरी) : महापालिकेच्यावतीने शालेय वस्तू खरेदीतील प्रस्तापित कंत्राटदारांची मक्तेदारी मोडीत काढून महापोर्टल ऐवजी जेम पोर्टलद्वारे निविदा मागवण्याच्या भाजपच्या पावित्र्यामुळे काँग्रेसचा थयथयाट सुरु झाला आहे. या शालेय वस्तूंची खरेदी यापूर्वीच्या दराच्या तुलनेत कमी आणि चांगल्या दर्जाच्या मिळण्याची शक्यता असून या शालेय वस्तू उशिराने मिळणार असल्याचे कारण पुढे करत काँग्रेसने नाराजी व्यक्त करत या निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारे शालेय मुलांना या वस्तू वेळेत मिळणार नाही यासाठी काँग्रेस पक्षाचा प्रयत्न सुरु असल्याचे दिसून येत आहे.

### १६ हजार वृक्षांची लागवड होणार

मुंबई (स. गांवकरी) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मुंबई महानगरपालिका आणि अँटोनी वेस्ट हँडलिंग सेल लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'रिरुट' या नागरी वन पुनर्स्थापना उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कांजूरमार्ग क्षेपणभूमी येथील कचरा प्रक्रिया केंद्र येथे शुक्रवारी ५ जून २०२६ रोजी सकाळी ८ वाजता या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या अंतर्गत, कांजूरमार्ग क्षेपणभूमी परिसरात सुमारे १६ हजार वृक्षांची लागवड केली जाणार आहे. या उपक्रमात नागरिकही येथे येऊन वृक्षारोपण करू शकतील, असे मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून कळविण्यात येत आहे.

# वर्धा, पुणे, ठाणे, यवतमाळ, ठाणे आणि रायगडमध्ये बिनविरोध

मुंबई : (स. गांवकरी)

विधानपरिषद निवडणुकीत छत्रपती संभाजीनगर, रायगड, पुणे आणि परभणीतील बंडखोरी शमविण्यात महायुतीच्या नेत्यांना यश आले. अर्ज माघारी घेण्याच्या मुदतीच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी चक्रे फिरवत अनेकांचे बंड थंड केले. तर दुसरीकडे शिंदेंच्या सेनेने ठाण्यातील निवडणूक बिनविरोध करण्यात यश मिळवले आहे. त्यामुळे मतदानापूर्वीच एकनाथ शिंदेंच्या सनेने गुलाल उधाळला आहे. पुणे जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विक्रम काकडे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी गुरुवारी (४ जून) सर्व प्रतिस्पर्धी उमेदवारांनी माघार घेतल्याने काकडे यांचाच एकमेव अर्ज शिल्लक राहिला आहे. निवडणूक प्रक्रियेनुसार अधिकृत घोषणा २२ जून २०२६ रोजी करण्यात येणार असली, तरी काकडे यांच्या विजयावर आता शिक्कामोर्तब झाल्याचे मानले जात आहे.



महायुतीच्या जागावाटपात हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आला होता. त्यामुळे पक्षाने विक्रम काकडे यांना उमेदवारी दिली होती. दुसरीकडे, महाविकास आघाडीच्या जागावाटपात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाला देण्यात आली होती. त्यानुसार श्रीकांत पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. तसेच भाजपचे जिल्हाध्यक्ष आणि जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद यांनी अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली होती.

मात्र, महायुतीचा धर्म पाळत प्रदीप कंद यांनी अखेर आपला अर्ज मागे घेतला. तर महाविकास आघाडीच्या मतदारांची संख्या तुलनेने कमी असल्याने श्रीकांत पाटील यांनीही माघार घेतल्याचा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे. त्यांच्या माघारीनंतर निवडणुकीतील चुरस संपुष्टात आली. याशिवाय माजी आमदार सुनील टिंगरे, तुषार कामठे आणि सुनील जरे या अपक्ष उमेदवारांनीदेखील आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात केवळ विक्रम काकडे यांचाच उमेदवारी अर्ज शिल्लक राहिला. उमेदवारी अर्ज माघारीनंतर पाच उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतल्याची अधिकृत घोषणा प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी गजानन पाटील यांनी केली. या घडामोडीनंतर पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधानपरिषदेची निवडणूक बिनविरोध पार पडण्याचा मार्ग मोकळा झाला असून, विक्रम काकडे यांची विधानपरिषदेतील एंट्री आता केवळ औपचारिकतेपुरतीच बाकी राहिली आहे.

पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेसाठी महायुतीची उमेदवारी मिळाल्यापासून चर्चेत असलेले विक्रम काकडे आता एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आले आहेत. काकडे यांनी अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांना १० कोटी रुपयांचे कर्ज दिल्याची माहिती नुकतीच समोर आली होती. मात्र, "ते कर्ज नसून बंगला खरेदी करण्यासाठी दिलेली आगाऊ रक्कम आहे," असा महत्त्वपूर्ण खुलासा खुद्द विक्रम काकडे यांनी केला आहे.

विक्रम काकडे यांच्या संपत्तीच्या विवरणपत्रात जय पवार यांच्या नावावर १० कोटी रुपये दाखवण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली होती. यावर स्पष्टीकरण देताना काकडे म्हणाले की, "मी जय पवार यांना कोणतेही कर्ज दिलेले नाही. प्रतिज्ञापत्रात 'लोन्स अँड ॲडव्हान्सेस' असा उल्लेख आहे. तो व्यवहार एका मालमत्तेसंदर्भात आहे. माझे सध्याचे घर यशवंत गाडगे नगरमधील बंगला क्रमांक ९ आहे आणि त्या शेजारील १० क्रमांकाचा बंगला जय पवार यांच्या नावावर आहे.

## राज्याचे माजी शिक्षणमंत्री अनंतराव थोपटे यांचे पुण्यात निधन



पुणे : (स. गांवकरी)

भोर मतदारसंघासह जिल्ह्याच्या राजकारणात दबदबा असलेले, माजी शिक्षणमंत्री, पालकमंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी (४ जून) निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. थोपटे यांच्या निधनामुळे जिल्ह्याचा बुलंद आवाज हरपल्याची भावना काँग्रेसकडून व्यक्त करण्यात आली.

अनंतराव थोपटे यांच्यावर दीनानाथ मंगशेकर रुग्णालयात गेल्या काही महिन्यांपासून उपचार सुरू होते. दोन दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संग्राम थोपटे यांचे ते वडील होत. थोपटे यांचा जन्म ११ जानेवारी १९३३ रोजी झाला. ते काँग्रेसचे निष्ठांवत कार्यकर्ते होते. भोर विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचा एकेकाळी मोठा दबदबा होता. जिल्ह्यातील काँग्रेसची पक्षसंघटना मजबूत करण्यात थोपटे यांचे महत्त्वाचे योगदान होते. थोपटे यांनी भोर मतदारसंघातून सहा वेळा विजय मिळविला. राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांनी १४ वर्षे विविध मंत्रीपदाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. दुसऱ्यांदा आमदार झाल्यानंतर त्यांना वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात स्थान मिळाले होते. मुख्यमंत्री पदाचे उमेदवार म्हणूनही त्यांच्या नावाची सातत्याने चर्चा होत होती. त्यांनी दुग्धविकास, पशुसंवर्धन, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री, परिवहन, पुनर्वसन, रोजगार हमी योजना मंत्री, संसदीय कार्यमंत्री अशा अनेक विभागांचा कारभार पाहिला होता. जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. अनंतराव थोपटे यांचे नाव मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत होते. मात्र, सन १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत पराभव पत्करावा लागल्यानंतर त्यांचे नाव मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीमधून मागे पडले.

## तुकाराम मुंढेंच्या बदलीनंतर 'पशुधन'कडे दुर्लक्ष...?

भाईंदर : (स. गांवकरी)

राज्यातील पशुधनाची डिजिटल नोंदणी, लसीकरण, टॅगिंग आणि पशुपालकांची माहिती एका व्यासपीठावर आणण्यासाठी राबविण्यात आलेल्या 'पशुधन'प्रणालीला काही वर्षांपूर्वी मोठी गती मिळाली होती. पशुसंवर्धन विभागात तत्कालीन सचिव म्हणून कार्यरत असलेल्या तुकाराम मुंढे यांच्या काळात या उपक्रमावर विशेष भर देण्यात आल्याची चर्चा होती. मात्र त्यांच्या बदलीनंतर या प्रणालीकडे अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याची भावना विभागातील काही कर्मचारी आणि पशुपालकांमध्ये व्यक्त होत आहे. राज्यात पशुधनाची अचूक माहिती उपलब्ध व्हावी, विविध योजनांचा लाभ थेट पशुपालकांपर्यंत पोहोचावा आणि जनावरांच्या आरोग्यविषयक नोंदी डिजिटल स्वरूपात उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने पशुधन नोंदणी उपक्रमाला चालना देण्यात आली होती. देशपातळीवरील डिजिटल



पशुधन व्यवस्थापन मोहिमेशी संबंधित ॲप आणि पोर्टलद्वारे जनावरांची माहिती संकलित केली जात आहे. मात्र गेल्या काही महिन्यांपासून ॲप मधील तांत्रिक अडचणी, माहिती अद्ययावत करण्यात होणारा विलंब आणि काही भागांतील नोंदणी प्रक्रियेचा मंदावलेला वेग याबाबत तक्रारी वाढत असल्याचे सांगितले जात आहे. काही वापरकर्त्यांनी ॲपच्या कार्यक्षमतेबाबतही प्रश्न उपस्थित केले आहेत. विभागातील अधिकाऱ्यांच्या दाव्यानुसार मुंढे यांच्या (२०२३-२४) कार्यकाळात पशुधनाच्या डिजिटल नोंदींना प्राधान्य देण्यात आले होते.

## पोटनिवडणूक लढवा : हुमायून कबीर यांचा बॅनर्जींना प्रस्ताव

मुंबई : (स. गांवकरी)

पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला. एवढंच नाही तर विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांचाही पराभव झाला. दरम्यान, आता तृणमूल पक्षात मोठ्या घडामोडी घडत आहेत. तृणमूल काँग्रेस पक्षात उभी फूट पडली आहे. ममता बॅनर्जी यांच्या पक्षाच्या तब्बल ५९ आमदारांच्या गटाला विधानसभेत मान्यता मिळाल्याने तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडल्याचं स्पष्ट झालं आहे.

या सर्व घडामोडी सुरू असतानाच तृणमूल काँग्रेसमधील अनेक नेते, पदाधिकारी आपल्या पदाचा राजीनामा देत आहेत. दोन दिवसांत दोन मोठ्या महापालिकेच्या महापौरांनी देखील राजीनामे दिले आहेत. त्यामुळे ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का बसला असून तृणमूलमध्ये फूट पडल्याने बंगालच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. या





घडामोडी सुरू असतानाच आता एक मोठी बातमी समोर आली आहे. ममता बॅनर्जी या पुन्हा एकदा लवकरच विधानसभेत निवडून जाऊ शकतात अशा चर्चांनी जोर धरला आहे. या चर्चांचं कारण म्हणजे आम जनता उन्नयन पार्टीचे नेते हुमायून कबीर यांनी ममता बॅनर्जी यांना एक प्रस्ताव दिल्याची चर्चा आहे. हुमायून कबीर यांनी आपण स्वत: विधानसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्यास तयार असून माझ्या मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांनी पोटनिवडणूक लढवत विधानसभेत जावं, अशी भूमिका मांडली आहे. त्यामुळे बंगालच्या राजकारणात पुन्हा चर्चांना उधाण आलं आहे.

'मी राजीनामा देतो, माझ्या जागेवरून ममता बॅनर्जी यांनी पोटनिवडणूक लढवावी', असं मोठं वक्तव्य हुमायून कबीर यांनी केलं आहे. याच हुमायून कबीर यांना काही महिन्यांपूर्वी तृणमूल काँग्रेसमधून निलंबित करण्यात आलं होतं. तृणमूल काँग्रेसमधून निलंबित करण्यात आल्यानंतर हुमायून कबीर यांनी 'आम जनता उन्नयन पार्टी' नावाने नवीन पक्ष स्थापन केला होता.

"ममता बॅनर्जी यांना मी रेजीनगरमधून विधानसभेत पाठवू शकतो. त्या नंदिग्राममधून निवडणूक लढवतील, तर त्या जिंकणार नाहीत. मात्र, जर त्यांची इच्छा असेल, तर मी राजीनामा देईन आणि माझ्या मतदारसंघातून त्यांचा विजय निश्चित करण्यासाठी प्रयत्न करेन", असं हुमायून कबीर यांनी म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

ममता बॅनर्जी यांच्या पक्षात सध्या घडणाऱ्या घडामोडीच्या पार्श्वभूमीवर सहानुभूती व्यक्त करताना हुमायून कबीर म्हणाले की, "माझ्या राजकीय उदयात ममता बॅनर्जी यांची महत्वाची भूमिका राहिली, याची मला जाणीव आहे. पण आज ममता बॅनर्जी यांची जी परिस्थिती झाली, ते पाहून मला खूप दुःख होत आहे. कारण आज मी जो काही आहे तो त्यांच्यामुळेच आहे", असंही ते म्हणाले.

# इंडिया आघाडीत फूट? काँग्रेसला धक्का

## ८ जूनच्या बैठकीत सहभागी न होण्याचा DMK चा निर्णय

मुंबई : (स. गांवकरी)

तमिळनाडूमधील विधानसभेच्या निवडणुकीनंतर अनेक घडामोडी पाहायला मिळाल्या. जोसेफ विजय यांच्या टीव्हीके पक्षाला काँग्रेसने पाठिंबा देत सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. मात्र, काँग्रेसने डीएमके बरोबरची युती तोडून टीव्हीकेला पाठिंबा दिल्याने डीएमके काँग्रेसवर नाराज झाल्याचं बोललं जात होतं. आता काँग्रेस आणि डीएमकेमधील नाराजी उघडपणे दिसून येत आहे.

नवी दिल्लीत ८ जून रोजी इंडिया आघाडीची एक महत्वपूर्ण बैठक होणार असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या बैठकीपूर्वी विरोधकांच्या इंडिया आघाडीला मोठा धक्का बसला आहे. कारण द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) पक्षाने ८ जूनच्या बैठकीचं निमंत्रण मिळूनही या बैठकीत सहभागी होणार नसल्याचं जाहीर केलं आहे. त्यामुळे इंडिया आघाडीत फूट पडल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. डीएमके पक्षाकडून जारी करण्यात आलेल्या एका निवेदनात म्हटलं की, "लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि राज्यांच्या अधिकारांसाठी हानिकारक मानल्या जाणाऱ्या मुद्द्यांना डीएमके पक्षाने सातत्याने विरोध केला. यामध्ये नीट परीक्षा, मतदारसंघ पुनर्रचना, निवडणुकांपूर्वी मतदार याद्यांची विशेष सखोल पुनर्तपासणी, निवडणूक आयोगाच्या भूमिकेबाबत आवाज उठवणं, एक राष्ट्र, एक निवडणूक प्रस्ताव आणि वक्फ कायदा व परकीय योगदान नियमन कायद्यातील (FCRA) दुरुस्त्या यासह आदी मुद्यांचा समावेश आहे."

"इंडिया आघाडीच्या स्थापनेपासून डीएमके पक्ष कायम आघाडीबरोबर राहिला आहे. तसेच पक्षाध्यक्ष एम.के.स्टॅलिन यांनी महत्त्वाचे राष्ट्रीय मुद्दे समोर आणण्यात महत्त्वाची भूमिका देखील बजावली आहे. मात्र, तमिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसने केलेल्या कथित 'विश्वासघातामुळे' डीएमकेचे कार्यकर्ते दुखावले गेले आहेत. कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर राखत काँग्रेस उपस्थित असलेल्या बैठकीला आम्ही उपस्थित न राहण्याचा निर्णय घेतला आहे", असं



डीएमकेने निवेदनात म्हटलं. या संदर्भातील वृत्त न्यूज १८ ने दिलं आहे. तसेच डीएमके पक्षाने हे देखील स्पष्ट केलं की,"आम्ही बैठकीतून माघार घेतली म्हणजे राष्ट्रीय महत्त्वाच्या मुद्द्यांवरून माघार घेतली असं अजिबात नाही. नीट, वक्फ कायदा, एक राष्ट्र, एक निवडणूक, एसआयआर आणि इतर सार्वजनिक मुद्द्यांवर आमची भूमिका कायम राहील आणि राष्ट्रीय हिताच्या मुद्द्यांवर इतर मित्रपक्षांना आम्ही पाठिंबा देत राहणार आहोत."

दरम्यान, नवी दिल्लीत ८ जून रोजी होणाऱ्या इंडिया आघाडीच्या या बैठकीला जवळपास १७ विरोधी पक्ष सहभागी होण्याची शक्यता आहे. या बैठकीत देशभरातील अनेक महत्वाच्या मुद्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. तसेच इंडिया आघाडीपासून नेहमीच सावध भूमिका घेणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी या देखील या बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

नवी दिल्लीत ८ जून रोजी होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीला विरोधी पक्षातील जवळपास सर्वच नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, आरजेडी नेते तेजस्वी यादव यांच्यासह उद्धव ठाकरे हे देखील उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

## बाळ माने यांची शिवसेना ठाकरे गटातून हकालपट्टी!

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी ठाकरे गटाला धक्का बसला. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग विधानपरिषद मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार (शिवसेना ठाकरे गट) सुरेंद्र ऊर्फ बाळ माने यांनी थेट भाजपचे मंत्री नितेश राणे यांच्यासोबत रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होत आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. या धक्कादायक निर्णयामुळे शिवसेना ठाकरे गटाकडून त्यांच्यावर कडक कारवाई करत पक्षातून त्यांची हकालपट्टी करण्यात आली.

बाळ माने यांच्या या निर्णयामुळे कोकण विधानपरिषद निवडणूक आता बिनविरोध होणार असली तरी ठाकरे गटासाठी हा धक्का मानला जात आहे. त्यांची तत्काळ पक्षातून हकालपट्टी करण्यात आल्यानंतर ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी त्यांच्या सोशल मिडीयावरून पोस्ट करत याबाबत माहिती दिली. "बाळ माने यांची शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आली आहे, पक्षविरोधी कारवायात सहभागी झाल्या बद्दल शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी ही कारवाई करण्यात



■ कोकण विधानपरिषदेतून उमेदवारी मागे घेतल्याने कारवाई; पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका

आल्याचे त्यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे. कोकण विभाग स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेच्या जागेसाठी महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये अत्यंत चुरस निर्माण झाली होती. महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) अनिकेत तटकरे यांना उमेदवारी दिली होती, तर त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाने बाळ माने यांना रिंगणात उतरवले होते. मात्र, ऐनवेळी बाळ माने यांनीच आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने निवडणुकीतील संपूर्ण रंगत संपली असून, अनिकेत तटकरे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## डोंगरगाव येथील कै.रंगनाथ (आप्पा) सहादू उगले यांचे दुःखद निधन!



डोंगरगाव (स. गांवकरी) : डोंगरगाव येथील कै.रंगनाथ सहादू उगले यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, दोन मुले, मुली, सुना,पुतणे, नातू, पतवंडे असा मोठा परिवार आहे.रामेश्वर रंगनाथ उगले डोंगरगाव ग्रामपंचायत उपसरपंच अमोल रंगनाथ उगले यांचे ते वडील होत. डोंगरगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांचा पंचक्रिया विधी शुक्रवार दिनांक 5/6/2026 रोजी सकाळी 8 वा. शैनेश्वर व भोलेश्वर आश्रम, डोंगरगाव येथे होणार असून, याप्रसंगी ह भ प दीपक महाराज देशमुख यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.

## राहुल ससाणे यांना पुणे विद्यापीठाची पीएच. डी पदवी प्रदान



पुणे (स. गांवकरी) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात राहुल ससाणे यांनी २०१८ मध्ये पीएच.डी प्रवेश निश्चित केला होता. "रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक साहित्यातील धर्मचिंतन" हा विषय घेऊन त्यांनी आपले संशोधन कार्य प्रा. डॉ. प्रभाकर देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केले. दिनांक १३ मे २०२६ रोजी त्यांची पीएच.डी पदवीची शेवटची मौखिक परिक्षा विद्यापीठाच्या मराठी विभागात संपन्न झाली. यावेळी बहि:स्थ परीक्षक म्हणून प्रा. डॉ. प्रमोद मुनगाटे , व अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे उपस्थित होते. काल दिनांक २१ मे २०२६ पीएच. डी पदवीचे declaration certificate विद्यापीठाकडून प्राप्त झाले. अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील आखेगाव या छोट्याशा गावातील एका दलित ऊसतोड मजुरांच्या कुटुंबातून येऊन राहुल ससाणे यांनी विद्यापीठाची पीएच.डी ही सर्वोच्च पदवी प्राप्त केली आहे. या अगोदर मराठी विषयात MA MPhil SET NET with JRF diploma in journalism इ. पदव्या त्यांनी प्राप्त केलेल्या आहेत.

## ऐतिहासिक दर्गा महापालिका प्रशासनाकडून उध्वस्त




- सर्वसाधारण सभेत जाब विचारण्याचा उपमहापौर परशुराम वाडेकर यांचा इशारा

पुणे (स. गांवकरी) : जुन्या पुणे मुंबई महामार्गावर असलेला बोपोडी येथील ऐतिहासिक हजरत शमसुद्दीन दर्गा महापालिका प्रशासनाने कोणतेही संयुक्तिक कारण न देता, स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता आणि आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता न करता मनमानी पद्धतीने कारवाई करून उध्वस्त केला आहे, असा आरोप उपमहापौर व स्थानिक नगरसेवक परशुराम वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला. याप्रकरणी सर्वसाधारण सभेत प्रशासनाला जाब विचारला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. बोपोडी येथे संबंधित दर्गा तब्बल दीडशे वर्षांपासून उभा आहे. त्याला राज्य शासनाचा अ वर्ग प्राप्त आहे. मेट्रो अथवा रस्ता रुंदीकरणात या दर्ग्याची कोणतीही अडचण नाही. या दर्ग्याबाबत कोणत्याही स्थानिक नागरिकाने अथवा लोकप्रतिनिधी तक्रार केलेली नाही. हा दर्गा या परिसरातील हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतिक होता. तरीही महापालिका प्रशासनाने लोकप्रतिनिधींची दिशाभूल करून या दर्ग्यावर अन्यायकारक कारवाई केल्याचे वाडेकर यांनी सांगितले. शिवशंकर स्वामी नामक एका व्यक्तीने हा दर्गा हटवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केल्याची माहिती मिळाल्याचे वाडेकर यांनी सांगितले. दर्ग्याच्या ट्रस्टला पूर्वकल्पना न देता, नोटीस न बजावता, उपमहापौर व स्थानिक नगरसेवक म्हणून आपल्याला व अन्य स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता रात्रीच्या अंधारात करण्यात आलेली ही कारवाई सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्याची मान खाली घालायला लावणारी आहे. रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आपण त्याच्यात तीव्र निषेध करतो, असे वाडेकर यांनी सांगितले. या प्रकाराची कल्पना आपण राज्य मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री चंद्रकांत पाटील यांना दिली असून त्यांनी देखील या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व महत्त्वाच्या नेत्यांचे प्रशासनाच्या मनमानी कारभाराकडे लक्षवेध होणार असल्याचेही वाडेकर यांनी स्पष्ट केले.

# नानजीभाई ठक्कर यांचे दातृत्व आदर्श : डॉ. विश्वासराव आरोटे

## गुजराती समाज हा देणारा समाज : गुजराती समाजाच्या सेवाभावी परंपरेचा डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केला गौरव!

- समाजाच्या नावावर गैरप्रकार करणाऱ्यांना थारा नाही
- संजयभाई पटेल यांच्या भूमिकेला आरोटे यांचा पाठिंबा!





पनवेल : (स. गांवकरी)

अखिल भारत गुजराती समाजाच्या कार्यक्रमाला उपस्थित असताना, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी गुजराती समाजाच्या दातृत्व, समाजसेवा आणि राष्ट्रनिर्माणातील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

डॉ. आरोटे म्हणाले की, देशाला आज पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांसारखे नेतृत्व देणाऱ्या गुजराती समाजाने केवळ व्यापार-उद्योग क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी कार्यातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. अखिल भारत गुजराती समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजयभाई पटेल यांच्या महाराष्ट्र आगमनाचे स्वागत करणे हे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, दैनिक समर्थ गांवकरी समूह आणि एन.के.टी. ट्रस्टचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी ज्येष्ठ समाजसेवक शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या कार्याचा विशेष गौरव केला. गुजरातच्या कच्छ भूमीत जन्मलेल्या आणि ठाणे ही कर्मभूमी असलेल्या नानजीभाई ठक्कर यांनी आयुष्यभर दानधर्म, शिक्षण, समाजसेवा आणि लोककल्याणासाठी केलेले कार्य संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी असल्याचे ते म्हणाले. वयाच्या ८४ व्या वर्षीही ते समाजकार्यात सक्रिय असून त्यांच्या दातृत्वाचा लाभ हजारो गरजू लोकांना होत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. आरोटे यांनी मध्यप्रदेश दौऱ्यात अखिल भारत गुजराती समाजाने उभारलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक सुविधांचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याचे सांगितले. समाजासाठी उभारलेल्या आधुनिक वास्तू, विविध उपक्रम आणि सर्व समाजघटकांना एकत्र आणण्याचे प्रयत्न हे अनुकरणीय असल्याचे त्यांनी नमूद केले.

अखिल भारत गुजराती समाज ही कायदेशीर आणि समाजहितासाठी कार्य करणारी संघटना असून तिच्या नावाचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात राष्ट्रीय अध्यक्ष संजयभाई पटेल यांनी घेतलेली कठोर भूमिका स्वागतार्ह असल्याचे त्यांनी सांगितले. समाजाच्या नावाखाली दलाली किंवा गैरप्रकार करणाऱ्यांना कोणतीही माफी नसावी, अशी भूमिका घेत अशा कारवायांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पूर्ण पाठिंबा देईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

"गुजराती समाज हा घेणारा नव्हे तर देणारा समाज आहे. समाजासाठी कमावलेली संपत्ती पुन्हा समाजकार्यासाठी खर्च करण्याची परंपरा या समाजाने जपली आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देशात गुजराती समाजाचे योगदान अमूल्य आहे," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

शेवटी संजयभाई पटेल व त्यांच्या सहकाऱ्यांचा साईबाबांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आल्याचा उल्लेख करत, "अतिथी देवो भव" ही महाराष्ट्राची संस्कृती जपत सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शिर्डीत आगमन झाल्यास सेवेसाठी सदैव तत्पर असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी उपस्थित सर्व पाहुण्यांचे स्वागत व आभार मानले.

"दान, सेवा आणि समाजहिताची परंपरा जपणाऱ्या गुजराती समाजाचे कार्य चिरंतन स्मरणात राहील," अशा शब्दांत त्यांनी आपल्या मनोगताचा समारोप केला.

# टेक्नोक्राफ्ट कंपनीच्या कामगारांना सन्मानाने कामावर घ्या



- सिटू संघटनेची गेटसमोर जोरदार घोषणाबाजी!

मुरबाड : (स. गांवकरी)

मे. टेक्नोक्राफ्ट इंडस्ट्रीज इंडिया लि. (गारमेंट डिव्हिजन), धानिवली-मुरबाड येथील कामगारांना तात्काळ सन्मानाने कामावर घेण्यात यावे, या मागणीसाठी सिटू संघटनेच्या वतीने कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. गेल्या सहा महिन्यांपासून टेक्नोक्राफ्ट कंपनीतील कामगार वारंवार होणाऱ्या अन्याय व दडपशाहीविरोधात न्याय मिळवण्यासाठी रास्तारोको, मोर्चे, आंदोलने आणि संपाच्या माध्यमातून लढा देत आहेत. स्थानिक आमदार किसन कथोरे यांच्या पुढाकाराने कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत मंत्रालयात झालेल्या बैठकीत सर्व कामगारांना कामावर हजर करून घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, या आदेशाची अंमलबजावणी न करता कंपनी प्रशासन मनमानी करत असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. कंपनीच्या आडमुठ्या धोरणामुळे आजही अनेक कामगार न्यायाच्या प्रतीक्षेत कंपनीच्या गेटबाहेर आंदोलनाच्या भूमिकेत उभे आहेत. कंपनी प्रशासनाने कामगारांचा संयम न तोडता तात्काळ त्यांना कामावर घ्यावे व कामगार कायद्यांचे पालन करावे, अशी मागणी आंदोलकांनी केली.

# कोतुळच्या पूजाने अखेर ध्येयाला गवसणी घातली




## अन मिळाली शासकीय नोकरी

कोतुळ : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील कोतुळ येथील पत्रकार अशोक शेळके,व सौ शांता अशोक शेळके यांची सुकन्या कु,पूजा( रोहिणी)अशोक शेळके हिने सरळ सेवा स्पर्धा परीक्षेत बाजी मारली असून, तिला गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज कोल्हापूर येथील शासकीय नोकरीचा आदेश राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे शुभ हस्ते दि 29 मे 2026 रोजी कोल्हापूर येथे देण्यात आला, कु, पूजा शेळके हि 2 ते 3 वर्षांपासून स्पर्धा परीक्षेचे पेपर देत होती, अत्यंत थोड्याशा गुणांनी तिला अपयशाला सामोरे जावे लागत होते, पण तिने आपली जिद्द, व चिकाटी सोडली नाही, वेळोवेळी ती नव्या ताकदीने नवी दिशा व नवी आशा घेऊन मी उभी राहत होती,आणि अखेर आगस्ट 2925 च्या परीक्षेतील निकालात तिने भरघोस यश संपादन केले,व 29 मे 2926 रोजी तिची शासकीय नोकरीसाठी कोल्हापूर येथील शासकीय मेडिकल कॉलेज येथे निवड झाल्याचे आदेश पत्र महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री मा, हसन मुश्रीफ यांचे हस्ते कोल्हापूर येथे सन्मानपूर्वक देण्यात आले, अभ्यासात अनेकदा अडचणीत आणणारे प्रश्न असतात, पण त्याचे समाधानकारक उत्तर शोधून काढणे, हे स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांसाठी एक आव्हान असते असे पूजा सांगते, अनेकदा पेपर लिहून झाल्यावर सुद्धा आपण कुठे कमी पडलो, हे शोधून त्यावर त्रुटी शोधणे हे स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांचे ध्येय असले पाहिजे, प्रबळ आत्मविश्वास, चिकाटी, जिद्द,व अभ्यासातील सातत्य विद्यार्थ्याला त्याच्या ध्येयापर्यंत पोचवतात, अशी पूजा सांगते, अनेकदा अभ्यासाचा कंटाळा, थकवा, अवघड प्रश्न, मनात घोंघावत असूनही शासकीय नोकरीचे सोनेरी स्वप्न तिला अभ्यासाकडे खेचून नेत होते वडील पेंटर, व आई विडी कामगार असूनही मुलांनी स्पर्धा परीक्षेतुन शासकीय नोकऱ्यांना जवळ केले आहे, त्यांचा मुलगा शिवा संतोष शेळके तर एम पी एस सी स्पर्धा परीक्षेत तीन वेळा उत्तीर्ण झाला, मंत्रालयीन अधिकारी/, विक्रीकर आयुक्त/, डी वाय,एस,पी/, ए,आर,टी,ओ या विविध पदांचा अनुभव तो घेत असून तो महाराष्ट्र शासनाचा क्लासवन अधिकारी बनला आहे, पूजा शेळके यांच्या निवडीचे, तालुक्याचे लोकप्रिय आमदार, डॉ किरण लहामटे, पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ, विश्वासराव आरोटे, कोतुळ चे सरपंच संजय देशमुख, बबलू देशमुख, माजी उपसरपंच राजेंद्र देशमुख, संजय लोखंडे, गणेश पोखरकर, डॉ, अभिजित देशमुख, रवींद्र आरोटे, व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# अखिल भारत गुजराती समाजाची नाशिक येथे बैठक संपन्न

नाशिक : (स. गांवकरी)

अखिल भारत गुजराती समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री संजय जे. पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक येथील प्रसिद्ध पंचवटी एज्युकेशन सोसायटीच्या प्रांगणात विशेष बैठक उत्साहात संपन्न झाली. यावेळी राष्ट्रीय महामंत्री श्री निलेशभाई शहा, राष्ट्रीय खजिनदार श्री मनोजभाई जा यांच्यासह राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य, पंचवटी एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी तसेच नाशिक गुजराती महिला मंडळाच्या प्रतिनिधींची उपस्थिती लाभली. बैठकीत अखिल भारत गुजराती समाजाच्या भावी योजना, संघटनेचा विस्तार, समाजोपयोगी शासकीय योजना, गुजरात सरकारच्या एनआरजी (NRG) विभागाची माहिती, विविध शैक्षणिक उपक्रम, समाजातील एकता आणि सर्वांगीण विकास या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. "एक समाज – श्रेष्ठ समाज" या ब्रीदवाक्याचा उल्लेख करत राष्ट्रीय अध्यक्ष श्री संजयभाई जे. पटेल यांनी समाजाच्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. तसेच समाजाच्या एकात्मतेसाठी आणि प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन केले. या बैठकीस महाराष्ट्रातील विविध भागांमधून अखिल भारत गुजराती समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये नागपूर येथील मोहनभाई दिवाणी, मिलेशभाई सांगाणी तसेच अकोला येथील हेमेंद्रभाई राजगुरू, हरीश लाखाणी, वालजीभाई पटेल आणि मनोजभाई भिमजियाणी यांचा समावेश होता.

यावेळी पंचवटी एज्युकेशन सोसायटीतर्फे अध्यक्ष श्री प्रकाशभाई पटेल यांच्या हस्ते अखिल भारत गुजराती समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री संजयभाई पटेल यांचा स्मृतिचिन्ह, मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पंचवटी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री प्रकाशभाई पटेल, विश्वस्त श्री मोहनभाई पटेल, श्री अनिल मेहता, संस्थेचे सचिव श्री देवेंद्रभाई पटेल, श्री हर्षद पटेल, श्री प्रवीणभाई परासिया, श्री जिग्नेश पटेल, श्री जितूभाई पारेख, श्री उर्विशभाई जोशी, सौ. अंजना जोशी तसेच श्री महेंद्रभाई मजिठिया उपस्थित होते. याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष श्री संजयभाई पटेल यांनी अखिल भारत गुजराती समाजातर्फे पंचवटी एज्युकेशन सोसायटीस रुपये ११,०००/- (अकरा हजार) देणगी देण्याची घोषणा केली. बैठकीचे सूत्रसंचालन अखिल भारत गुजराती समाजाचे महाराष्ट्र व गोवा राज्याचे मानद सचिव श्री महेंद्रभाई मजिठिया यांनी केले. उपस्थितांनी बैठकीच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले.

# खासदार वाकचौरेंना 'शिंदे सेनेत' ढकलण्याचे षडयंत्र?

(स. गांवकरी)

- खुद्द वाकचौरेंचाच गंभीर आरोप!
- उबाठा मेळाव्यातून उफाळला अंतर्गत संघर्ष
- वाकचौरेंच्या अनुपस्थितीवरून राजकीय खळबळ!
- 'मला मेळाव्याची माहितीच नव्हती'; वाकचौरेंचा गौप्यस्फोट, उबाठात नवा वाद!
- वाकचौरेंच्या पक्षांतराची चर्चा की नियोजित वातावरणनिर्मिती? शिर्डीत राजकीय तापमान वाढले!
- खैरे यांच्या वक्तव्याने खळबळ; 'ते जाणारच आहेत' म्हणत वाकचौरेंबाबत नवा वाद!







राज्यात पुन्हा एकदा पक्षांतराच्या राजकारणाची चर्चा रंगू लागली असतानाच शिर्डी लोकसभा मतदारसंघातील राजकीय घडामोडींनी नवे वळण घेतले आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी पक्षातील काही नेत्यांवर अप्रत्यक्षपणे गंभीर आरोप करत, आपल्यालाच पक्षांतरासाठी प्रवृत्त करण्याचे अथवा 'शिंदे सेनेत' ढकलण्याचे नियोजनबद्ध षडयंत्र रचले जात असल्याचा खळबळजनक दावा केला आहे. शिर्डीत नुकत्याच झालेल्या उबाठा गटाच्या जिल्हा मेळाव्यानंतर निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर वाकचौरे यांनी मांडलेली भूमिका राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.

देश आणि राज्यातील बदलत्या राजकीय परिस्थितीत मतदारांचा कल झपाट्याने बदलत असल्याचे चित्र दिसत आहे. अनेक राज्यांमध्ये विरोधी पक्षांना धक्के बसत असून पक्षांतराच्या चर्चांना उधाण आले आहे. त्याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातही पुन्हा एकदा 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांनी वेग घेतला आहे. या चर्चांचे पडसाद आता थेट अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात उमटताना दिसत आहेत.

मंगळवारी (ता. २) शिर्डीत उबाठा गटाचा जिल्हा मेळावा पार पडला. या मेळाव्यास खासदार संजय राऊत, माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह पक्षाचे अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. मात्र या मेळाव्याला शिर्डीचे विद्यमान खासदार भाऊसाहेब वाकचौरे गैरहजर राहिल्याने राजकीय चर्चांना मोठे खतपाणी मिळाले. मेळाव्यानंतर पत्रकारांनी खासदार वाकचौरेंच्या अनुपस्थितीबाबत विचारणा केली असता, ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे यांनी केलेले वक्तव्य अधिकच चर्चेत आले. "ते जाणारच आहेत, मात्र त्यांनी जाऊ नये," असे खैरे यांनी म्हटल्याने वाकचौरे यांच्या संभाव्य पक्षांतराच्या चर्चांना आणखी बळ मिळाले. या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात वाकचौरे लवकरच शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. मात्र या सर्व चर्चांवर खासदार भाऊसाहेब वाकचौरेंनी स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया देत नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की, निवडणुका संपल्यानंतर मतदारसंघाच्या विकासासाठी सत्ताधाऱ्यांशी संवाद ठेवणे आवश्यक असते. जनतेची कामे मार्गी लावण्यासाठी विविध पक्षांच्या लोकप्रतिनिधींशी संबंध ठेवावे लागतात. याचा अर्थ पक्षांतर असा काढणे पूर्णपणे चुकीचे असून राजकीय अपरिपक्वतेचे लक्षण आहे.

मध्यंतरी शिंदे सेनेच्या काही खासदारांनी आयोजित केलेल्या स्नेहभोजन कार्यक्रमाला उपस्थित राहिल्यामुळेही त्यांच्या पक्षांतराच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र त्या चर्चांनाही त्यांनी फेटाळून लावत विकासाच्या राजकारणाला प्राधान्य दिल्याचे स्पष्ट केले. आपण शिर्डी मेळाव्यास अनुपस्थित राहण्यामागील कारणही त्यांनी स्पष्ट केले. वाकचौरे म्हणाले की, ते सध्या केंद्र सरकारच्या स्थायी संसदीय समितीचे सदस्य आहेत. समितीच्या अध्यक्षांनी जानेवारी महिन्यातच पंजाब, जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेश या राज्यांच्या अभ्यास दौऱ्याचे वेळापत्रक निश्चित केले होते. २८ मे ते ६ जून या कालावधीत समितीचा अधिकृत दौरा सुरू असून त्यानुसार ते सध्या हिमाचल प्रदेशात आहेत. त्यामुळे शिर्डी मेळाव्यास उपस्थित राहणे शक्य झाले नाही. याहून धक्कादायक दावा करताना वाकचौरेंनी सांगितले की, शिर्डीत अशा प्रकारचा जिल्हा मेळावा आयोजित करण्यात येत आहे किंवा राज्यातील वरिष्ठ नेते येणार आहेत, याची कोणतीही अधिकृत माहिती त्यांना देण्यात आलेली नव्हती. पक्षाचा विद्यमान खासदार असताना देखील आपल्याला कार्यक्रमाबाबत अंधारात ठेवण्यात आले, असा दावा त्यांनी केला. त्यामुळे पक्षातील अंतर्गत समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, विद्यमान खासदाराला कार्यक्रमापासून दूर ठेवणे, त्याच्या अनुपस्थितीवर सार्वजनिकरित्या संशय व्यक्त करणे आणि त्याच्या पक्षांतराच्या चर्चा पक्षातीलच वरिष्ठ नेत्यांकडून पुढे येणे, ही बाब गंभीर मानली जात आहे. त्यामुळे वाकचौरेंना जाणीवपूर्वक कोंडीत पकडण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. भाऊसाहेब वाकचौरे यांचा राजकीय प्रवासही विविध पक्षांतील अनुभवांनी भरलेला आहे. २००९ मध्ये ते शिवसेनेकडून लोकसभेवर निवडून गेले होते. त्यानंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. २०१४ मध्ये काँग्रेसकडून निवडणूक लढवली मात्र यश मिळाले नाही. पुढे भाजपमध्ये प्रवेश केला; मात्र उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली. अखेर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे गटाकडून उमेदवारी मिळवत त्यांनी विजय संपादन केला.

दरम्यान, विधानसभा निवडणुकांनंतर राज्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलत आहेत. महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये अस्वस्थता असल्याच्या चर्चा सुरू असून आगामी काळात काही मोठे राजकीय निर्णय होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अशा परिस्थितीत वाकचौरेंसारख्या प्रभावी लोकप्रतिनिधीबाबत सुरू झालेल्या चर्चांकडे राज्याचे लक्ष लागले आहे. शिर्डी मेळाव्यानंतर उबाठात धुसफूस; वाकचौरेंचा पक्ष नेतृत्वावर अप्रत्यक्ष निशाणा : शिर्डीतील घडामोडी या केवळ एका मेळाव्यातील अनुपस्थितीपुरत्या मर्यादित नसून त्या राज्यातील बदलत्या राजकीय वास्तवाचे संकेत मानले जात आहेत. सत्ताधाऱ्यांशी संवाद ठेवणे ही लोकप्रतिनिधींची गरज बनली असताना पक्षांतर्गत अविश्वास आणि सार्वजनिक आरोप-प्रत्यारोप हे पक्षसंघटनांसाठी धोक्याचे ठरू शकतात. उबाठा गटातील हा विसंवाद पुढे आणखी वाढणार की पक्ष नेतृत्व त्यावर पडदा टाकण्यात यशस्वी होणार, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी पक्षांतराच्या चर्चांना स्पष्टपणे नकार दिला असला तरी पक्षातीलच काही नेत्यांच्या वक्तव्यांमुळे निर्माण झालेला संशय आणि त्यातून निर्माण झालेली राजकीय धुसफूस आगामी काळात शिर्डीच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवून आणण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## जुन्नर मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत बीएलओ यांना साहित्य किट वाटप

शिवनेरी (स. गांवकरी) : तहसिल कार्यालय जुन्नर निवडणूक शाखा यांनी गुरुवार दि. ४ रोजी भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आगामी काळात राबवल्या जाणाऱ्या 'मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम'२०२६ अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. १९५ जुन्नर विधानसभा मतदार संघात तहसिल कार्यालय जुन्नर येथे मतदान नोंदणी अधिकार पल्लवी घाडगे व सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार बाळासाहेब शिरसट यांच्या मार्गदर्शनानुसार प्रभारी निवडणूक नायब तहसीलदार दीपक मडके यांच्या प्रमुख उपस्थिती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी संजय उंडे,शिवाजी जाधव,नितीन लांडे,विशाल उतळे हे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बी एल ओ किट यांना वाटप करण्यात आले. किटमधील मुख्य लेखन साहित्य , ओळखपत्र लेस , पेन, रजिस्टर, फोल्डर फाईल, हायलायटर आणि साहित्यासाठी विशेष बॅग सह आवश्यक किट अधिकृत वाटप करण्यात आले. या साहित्य वाटप प्रसंगी निवडणूक विभागातील पुंडलिक सुपे ,विवेक डुंबरे, अभिषेक सुतार,विशाल वायाळ, सिद्धार्थ गावतुरे , स्वप्नील दप्तरे हे कर्मचारी उपस्थित होते.

## नारायणगावात पावसामुळे वीज यंत्रणेचे नुकसान

खोडद (स. गांवकरी) : नारायणगाव व वारूवाडी परिसरात मंगळवारी दुपारी झालेली गारपीट आणि वादळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. नारायणगाव व आसपासच्या परिसरामध्ये नुकत्याच झालेल्या मुसळधार वादळी पाऊस आणि गारपिटीमुळे महावितरणचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक भागांत सोसाट्याच्या वाऱ्यामुळे विजेचे खांब व झाडे उन्मळून पडली आहेत आणि वीज वाहक तारा तुटून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. महावितरण'चे २० लाख तर जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे ३८ लाख रुपयांचे नुकसान झाले असून, शेती पिकांचेही नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी तारा तुटून व खांब पडून वीज वितरण व्यवस्था विस्कळीत झाली आहे. मंगळवारी दुपारी अडीच ते साडेचार च्या दरम्यान सुमारे ७० मिमी पावसाची नोंद झाली. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे महावितरण यांचे २० पोल आणि सात हजार ६०० फूट वीजवाहिन्या तुटून पडल्यामुळे ग्रामीण भागातील वीजपुरवठा खंडित झाला असून तो पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती अभियंता बी. एस .बिराजदार यांनी दिली. वारूळवाडी येथे तुटलेल्या वीज वाहिनीच्या तारेचा स्पर्श झाल्यामुळे ५ मेंढ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. बाजार समितीचे पाच शेड भुईसपट झाल्याने लिलाव आता टोमॅटो उपबाजार आवारात होतील ,असे सभापती संजय काळे यांनी सांगितले.

# निवडणूकीत दिलेला शब्द आम्ही पाळला : प्रांजल चिंतामणी

## छत्रपती शिवाजी नगर व संताजीनगर भागातील ड्रेनेज लाईनचे काम दर्जेदार करणार : नगरसेवक प्रविण सानप

जामखेड तालुका : (स. गांवकरी)



- छत्रपती शिवाजी महाराज नगर येथे भूमिगत ड्रेनेज लाईनचे काम सुरू.
- मागील वर्षी पावसामुळे घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे नुकसान झाले होते.
- सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सूचनेनंतर कामाला गती.
- ड्रेनेज लाईनची खोली सुमारे सहा फूट ठेवण्यात येणार.
- सांडपाण्याच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्र चेंबर उभारण्यात येणार.पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघणार

जामखेड शहरात मागील वर्षीच्या पावसाळ्यात शिवाजी नगर व संताजीनगर परिसरातील अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. या समस्येच्या कायमस्वरूपी तोडगा निघावा यासाठी परिसरातील रहिवाशांनी सभापती प्रा. राम शिंदे यांच्याकडे मागणी केली होती.

त्यानंतर त्यांच्या सूचनेनुसार नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी व प्रभागाचे नगरसेवक प्रविण सानप यांनी पाठपुरावा करून भूमिगत ड्रेनेज लाईनच्या कामाला गती दिली असून कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. पाहणीदरम्यान नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी यांनी सांगितले की, निवडणूक प्रचारादरम्यान नागरिकांनी या भागातील पाणी साचण्याची व घरांमध्ये पाणी शिरण्याची गंभीर समस्या मांडली होती. त्यावेळी ही समस्या प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार आता भूमिगत ड्रेनेज लाईनचे काम सुरू करण्यात आले असून ते दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच शहरातील इतर भागांतील पावसाळ्यापूर्वीच्या समस्यांचाही आढावा घेऊन संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.।

नगरसेवक प्रविण सानप यांनी सांगितले की, हे काम वैशिष्ट्यपुर्ण निधि अंतर्गत करण्यात येत आहे. नागरिकांना घरातील सांडपाणी ड्रेनेज लाईनमध्ये सोडता यावे यासाठी विविध ठिकाणी चेंबरची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच ड्रेनेज लाईनची खोली सुमारे सहा फूट ठेवण्यात आल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होऊन परिसरातील पाणी साचण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होईल.यावेळी परिसरातील रहिवासी राम निकम यांनीही समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, “गेल्या वर्षी घरात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले होते. ही बाब सभापती प्रा. राम शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी व नगरसेवक प्रविण सानप यांच्या माध्यमातून तातडीने कार्यवाही केली. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून आम्ही त्यांचे आभारी आहोत.”

या पाहणीवेळी नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, नगरसेवक प्रविण सानप, शिक्षक नेते राम निकम यांच्यासह प्रभागातील महिला भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरएसपीएल समूहाने ५० वर्षांचा प्रवास केला साजरा

पुणे : (स. गांवकरी)

भारतातील आघाडीच्या वेगाने विक्री होणाऱ्या ग्राहक वस्तू उत्पादक समूहांपैकी एक असलेल्या आरएसपीएल समूहाने आपल्या स्थापनेची ५० वर्षे पूर्ण केली असून, कानपूरपासून भारत आणि जागतिक स्तरावरील वाढत्या उपस्थितीपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास अधोरेखित केला आहे. गेल्या अनेक दशकांमध्ये कंपनीने “भारतामध्ये निर्मित, भारतासाठी” या दृष्टिकोनाला चालना देत देशभरातील २४ हून अधिक उत्पादन प्रकल्पांद्वारे देशांतर्गत उत्पादन क्षमतांना बळकट केले आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्याचे स्मरण करण्यासाठी, आरएसपीएल समूहाने एक लघुपट सादर केला आहे, जो कंपनीचा प्रवास, मूल्ये आणि विकसित होत जाणारी दृष्टी जिवंत करतो. प्रसिद्ध अभिनेते आणि चित्रपट निर्माते रजत कपूर यांच्या निवेदनातून साकारलेला हा चित्रपट भारतासोबत विकसित झालेल्या ब्रँडची भावना प्रतिबिंबित करतो. हा समूह आपल्या प्रमुख ब्रँड घडी डिटर्जंटच्या स्थापनेला पाच दशके पूर्ण झाल्याचा उत्सव साजरा करत आहे.

## मोदी सरकारची बारा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आढावा बैठक

खोडद : (स. गांवकरी)



हॉटेल गोविंद गार्डन येथे मोदी सरकारची पूर्ण होत असल्याबद्दल आढावा बैठक संपन्न झाली. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या ऐतिहासिक कामगिरीची १२ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, “मोदी सरकारची १२ वर्षे – विश्वास, विकास व जनकल्याणाची” या कार्यक्रमांतर्गत पश्चिम महाराष्ट्र विभागाच्या संघटनात्मक संपर्क दौऱ्यांतर्गत पिंपरी-चिंचवड व पुणे उत्तर (मावळ) जिल्ह्याची विभागीय आढावा बैठक आज मोठ्या उत्साहात पार पडली. ‘राष्ट्र प्रथम’ या मूल्याधिष्ठित संकल्पनेतून सातत्याने सेवा देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली,गरीब,शोषित आणि वंचित घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी तसेच ‘विकसित भारत’ या ध्येयपूर्तीसाठी सरकार वेगाने पुढे जात आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष मा.नितीन नबीनजी यांच्या नेतृत्वात व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, या १२ वर्षांच्या उल्लेखनीय कार्याचा आढावा घेत जिल्ह्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या निमित्ताने आयोजित आढावा बैठकीत सरचिटणीस,भाजपा महाराष्ट्र प्रदेश (विभाग समन्वयक) आ.निरंजनजी डावखरे,विभाग सहसंयोजक मा.विक्रमजी देशमुख,अभियान प्रदेश सहसंयोजक आ.विक्रमजी पाचपुते,यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले यावेळी मा.खासदार रणजीतजी सिंह नाईक निंबाळकर, मा.खासदार अमरजी साबळे,आमदार महेशदादा लांडगे,आमदार शंकरशेठ जगताप,माजी आमदार अश्विनीताई जगताप,भरतजी पाटील व पिंपरी चिंचवड शहर व पुणे जिल्हा उत्तरचे सर्व प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप दादा कंद व भाजपा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष,मा.शत्रुघ्न (बापू) काटे, यांनी भूषवले.या विभागीय आढावा बैठकीत संघटनात्मक बळकटीकरण,आगामी कार्यक्रमांची रूपरेषा आणि जनसंपर्काच्या प्रभावी अंमलबजावणीवर सखोल चर्चा झाली. विश्वास,विकास आणि जनकल्याण या त्रिसूत्रीवर आधारित मोदी सरकारच्या कार्याचा संदेश तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा दृढ संकल्प या बैठकीतून व्यक्त झाला.

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी तहसीलदारांना निवेदन

इगतपुरी: (स. गांवकरी)



कृषिप्रधान देशात आज बळीराजा अत्यंत कठीण आणि दुर्दैवी परिस्थितीतून जात आहे. शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित आणि गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेच्या वतीने नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा कृषि अधिकारी आणि नाशिक तहसीलदार यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

मनसे शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे यांच्या सूचनेनुसार, मनसे शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष रामदास जाधव व इगतपुरी तालुकाध्यक्ष नागेश गायकर यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. याप्रणालीत जिल्ह्यातील शेतकरी वर्गाचे प्रतिनिधी ज्ञानेश्वर भोर, मधुकर भोर, गिरीश रघुवीर वैशणव आणि मनिषा भोर आदी उपस्थित होते. शेतमालाला हमीभाव शेती मालाला योग्य हमीभाव मिळाला पाहिजे. उत्पादन खर्च, खते, बियाणे आणि मजुरी यांचा अचूक अंदाज घेऊन आधारभूत मालाची वर्गवारी करावी व शेतमालाची योग्य किंमत जाहीर करावी, खतांच्या किमतीवर नियंत्रण रासायनिक खतांच्या किमती सध्या भरमसाठ वाढवल्या गेल्या आहेत, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या मालाला कवडीमोल किंमत मिळत आहे. त्यामुळे रासायनिक खतांचे दर योग्य प्रमाणात असणे गरजेचे आहे. युरिया खताची उपलब्धता सध्या कृषी दुकानांमध्ये युरिया खताचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. पिकांसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या या खताची उपलब्धता प्रशासनाने तातडीने करून द्यावी. इतर रासायनिक खते, बाजारात १०:२६:२६, १५:१५:२०:२० आणि सम्राट दाणेदार खते पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात यावीत. बोगस बियाणे व खतांवर कारवाई: सध्या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर बोगस बियाणे आणि रासायनिक खतांवर बोगस लेबल लावून विक्री केली जात आहे.

## लहान वयातच मुलांना व्यायामाची व खेळाची आवड लागावी

खोडद : (स. गांवकरी)



नारायणगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत कुस्ती प्रशिक्षण शिबिराच्या समारोप कार्यक्रमात आमदार अतुल बेनके यांनी कुस्ती हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि परंपरेचा अविभाज्य भाग असल्याचे सांगितले. लहानपणापासून मुलांमध्ये व्यायाम, फिटनेस आणि खेळांची आवड निर्माण झाली तर भविष्यात राज्य व देशासाठी उत्कृष्ट खेळाडू घडू शकतात, असे त्यांनी नमूद केले.

कुस्ती हा केवळ एक खेळ नसून ती महाराष्ट्राची शौर्य, परंपरा आणि समृद्ध सांस्कृतिक वारश्याचे प्रतीक आहे. त्यामुळे गावोगावी भरविल्या जाणाऱ्या कुस्ती स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील युवा पैलवानांना प्रोत्साहन मिळते आणि त्यांना एक हक्काचे व्यासपीठ प्राप्त होते.महाराष्ट्राच्या मातीतल्या या पारंपरिक खेळाचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज असून, यामुळे तरुणांमध्ये शिस्त आणि सकारात्मक जीवनशैली रुजते. राजमुद्रा सामाजिक सेवा संस्था, नारायणगाव आणि जुन्नर तालुका कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते १६ वयोगटातील मुला-मुलींसाठी एक महिन्याचे विनामूल्य कुस्ती प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रशिक्षकांनी कुस्तीतील विविध डावपेच, शारीरिक तंदुरुस्ती, संतुलित आहार, व्यायामाचे महत्त्व आणि शिस्त याबाबत माहिती दिली.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष चव्हाण, भाजप युवा मोर्चाचे पुणे जिल्हाध्यक्ष गणेश कवडे, राजमुद्रा सामाजिक सेवा संस्थेचे अध्यक्ष आकाश नलावडे कार्याध्यक्ष रोहित वाबळे, नारायणगावचे सरपंच योगेश पाटे , वारूळवाडीचे सरपंच विनायक भुजबळ, सचिव ऋषिकेश औटी ,राष्ट्रवादी काँग्रेस जुन्नर तालुका अध्यक्ष विकास दरेकर , ड.शिवदास तांबे, आशिष माळवदकर आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरातील विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. शिबिरामध्ये अनुभवी प्रशिक्षक सुरेश काकडे आणि विलास कदम यांनी विद्यार्थ्यांना कुस्तीतील विविध डावपेच ,शरीरिक तंदुरुस्ती ,संतुलित आहार ,व्यायामशास्त्र, शिस्त आणि खेळाडूवृत्ती यांचे सखोल मार्गदर्शन केले.

डिजिटल युगात मुलांचे आरोग्य जपण्यासाठी व्यायाम, कुस्ती आणि पारंपरिक खेळांविषयी आवड निर्माण होणे गरजेचे असल्याचे मतही उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहित वाबळे यांनी केले. आकाश नलावडे यांनी उपस्थित असलेल्यांचे स्वागत केले तर सचिव ऋषिकेश औटी यांनी आभार मानले ,वैभव दरंदळे, संदेश केदारी ,अतिश बुचके आणि कुणाल आवाळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# देवठाण आश्रमशाळेची शालांत परीक्षेत दैदिप्यमान कामगिरी

## गुणवंत विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाकडून रोख पारितोषिक जाहीर

अकोले : (स. गांवकरी)





शालांत व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत विशेष गुणांसह प्राविण्य प्राप्त अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांमध्ये अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक स्तरावर इयत्ता १० वी (शासकीय व अनुदानित आश्रमशाळा) गटातून आदिवासी उन्नती सेवा मंडळ, राजूर संचलित अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, देवठाण, ता. अकोले, जि. अहिल्यानगर या आश्रमशाळेने उल्लेखनीय यश संपादन करून आपला शैक्षणिक दर्जा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे.

विद्यालयाची विद्यार्थिनी कु. पूजा चंद्रकांत खोकले (रा. पाचपट्टा) हिने शालांत परीक्षेत 89.60 टक्के गुण प्राप्त करून मुलींच्या गटात प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच विद्यालयाचा विद्यार्थी चि. रुद्राक्ष शांताराम भोईर (रा. टाकळी) याने 86.00 टक्के गुण प्राप्त करून मुलांच्या गटात प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

या उल्लेखनीय यशाची दखल घेऊन अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक कार्यालयामार्फत दोन्ही गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी रुपये 35,000/- इतके रोख पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर यांच्याकडूनही विद्यार्थ्यांना भरीव स्वरूपाची प्रोत्साहनपर रक्कम बक्षीस म्हणून जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव अधिक वाढला असून इतर विद्यार्थ्यांनाही उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीसाठी प्रेरणा मिळणार आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, अभ्यासातील जिद्द, चिकाटी आणि शिस्तबद्ध तयारी याबरोबरच शिक्षकांचे मार्गदर्शन व परिश्रम महत्त्वाचे ठरले आहेत.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी नियमित अध्यापन, अतिरिक्त सराव वर्ग, वैयक्तिक मार्गदर्शन, विविध अभ्यास चाचण्या तसेच सतत मूल्यमापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम बनविले. विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी शैक्षणिक नियोजन, गुणवत्तापूर्ण अध्यापन, पालकांशी सातत्यपूर्ण समन्वय, विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे आणि शिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन करणे या माध्यमातून उत्कृष्ट नेतृत्व प्रदान केले. त्यांच्या कुशल नियोजनामुळे व शिक्षकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश संपादन करणे शक्य झाले आहे

आदिवासी उन्नती सेवा मंडळ, राजूर ही अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजूर येथे कार्यरत असलेली एक अग्रगण्य सामाजिक व शैक्षणिक संस्था आहे. दुर्गम व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सर्वांगीण विकासासाठी संस्था विविध आश्रमशाळा व वसतिगृहे यशस्वीपणे चालवत आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, निवासी सुविधा, शैक्षणिक साहित्य, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तसेच प्रगत शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यात संस्थेचा मोलाचा वाटा आहे.

संस्थेचे संस्थापक स्वर्गीय कै. मधुकररावजी पिचड साहेब (माजी आदिवासी विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या दूरदृष्टीतून उभी राहिलेली ही संस्था आजही आदिवासी समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी कार्यरत आहे.

संस्थेचे कायम विश्वस्त मा. आमदार वैभवराव पिचड, कायम विश्वस्त सचिव प्रा. मंगलदास भवारी, अध्यक्ष भरतरावजी घाणे तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर यांच्या प्रकल्प अधिकारी मा. देवकन्या बोकडे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी मा. दीपक कालेकर मा. अंबादास बागुल व संबंधित अधिकाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे, मुख्याध्यापकांचे, शिक्षकवृंदांचे व संस्थेच्या सर्व संबंधितांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

देवठाण आश्रमशाळेने संपादन केलेल्या या दैदिप्यमान यशामुळे संस्थेचा, आश्रमशाळेचा आणि संपूर्ण परिसराचा शैक्षणिक गौरव उंचावला असून इतर विद्यार्थ्यांसाठीही हा आदर्श प्रेरणादायी ठरणार आहे.



# निवडणुकीत 'दोन्ही पॅनल एकाच नाण्याच्या दोन बाजू'

पुणे : (स. गांवकरी)

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या आगामी निवडणुकीत समोरासमोर दिसणारी दोन प्रमुख पॅनल प्रत्यक्षात एकाच विचारधारेची असून त्यांच्यातील संघर्ष हा केवळ दिखावा असल्याचा गंभीर आरोप अपक्ष उमेदवार शरद लोणकर यांनी केला आहे. गेल्या दहा वर्षांत महामंडळाच्या कारभारात असलेल्या संचालकांनी चित्रपटसृष्टीच्या प्रश्नांवर ठोस काम करण्याऐवजी अंतर्गत वाद आणि राजकारणातच वेळ घालवल्याचा आरोप त्यांनी केला. प्रस्थापितांची मुजोरी मोडीत काढून महामंडळ आणि सदस्यांच्या हितासाठी आठ अपक्ष उमेदवारांनी एकत्र येऊन संघ उभा केल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



या पत्रकार परिषदेला दिग्दर्शक अमोल भावे, निर्माता महादेव शिरोळकर, मानसिंग कदम, कला दिग्दर्शक उल्हास लांडगे या उमेदवारांसह अपक्ष संघाला पाठिंबा देणाऱ्या अभिनेत्री, निर्मात्या भाग्यश्री देसाई या उपस्थित होत्या. अभिनेत्री स्मिता गोंदकर आणि शाहीर संभाजी भगत यांच्यासह अनेकांचा आपल्याला पाठिंबा असल्याचा दावा अपक्ष संघाच्या वतीने करण्यात आला. यावेळी बोलताना लोणकर म्हणाले की, दोन्ही पॅनलमधील अनेक माजी संचालक वेगवेगळ्या गटांतून निवडणूक लढवत असले तरी त्यांच्यातील परस्पर समन्वय स्पष्ट दिसून येतो. काही उमेदवारांना बिनविरोध निवडून आणण्यासाठी दोन्ही गटांनी एकमेकांना मदत केल्याचा आरोप करत त्यांनी या संपूर्ण प्रक्रियेला "मिलीभगत" असे संबोधले. महामंडळाच्या निवडणुकीत राजकीय हस्तक्षेप नसल्याचा दावा देखील त्यांनी फेटाळून लावला. काही उमेदवार आणि राजकीय नेत्यांमधील संबंध सर्वश्रुत असल्याचे सांगत, निवडणूक प्रक्रियेवर राजकीय प्रभाव अद्याप कायम असल्याचे त्यांनी म्हटले.

वितरण आणि प्रसिद्धी विभागातून निवडणूक लढवत असलेल्या लोणकर यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांवरही टीका केली. चित्रपटसृष्टीतील प्रसिद्धी आणि वितरण व्यवसायाच्या नावाखाली आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप करत, आपण गेली चार दशके विनामूल्य प्रसिद्धीचे काम केले असल्याचे त्यांनी सांगितले.



ठाणे : दिवा शहरात मिनी हायमास्टचे उद्घाटन करण्यात आले. दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या प्रमुख उपस्थित आज धर्मवीर नगर व दातिवली चौक येथे मिनी हायमास्ट दिव्याचे उद्घाटन करण्यात आले. प्रसंगी नगरसेविका साक्षी मढवी, विभागप्रमुख विनोद मढवी, चरणदास म्हात्रे, शशिकांत पाटील, राजेश पाटील, शाखाप्रमुख राहुल गायकर, रूपेश मढवी, बाबाजी गुरव, सोपान म्हात्रे, महेश पाटील, पंकज बोबडे, राम गिरकर व अनेक शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### दिव्यात महागाई विरोधात ठाकरे शिवसेनेचे निषेध आंदोलन

ठाणे (स. गांवकरी) : शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत व कल्याण जिल्हाप्रमुख अभिजीत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कल्याण ग्रामीण विधानसभा उपजिल्हाप्रमुख ॲड. रोहिदास मुंडे व दिवा शहरप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज दिवा शहरात वाढत्या महागाई विरोधात जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले. केंद्र व राज्य सरकारच्या जनविरोधी धोरणांमुळे सर्वसामान्य नागरिकांवर महागाईचे मोठे संकट ओढवले आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या वाढत्या किंमतींमुळे सामान्य नागरिकांचे जीवन अत्यंत कठीण झाले आहे. या वाढत्या महागाईविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने सरकारचा निषेध नोंदविण्यात आला. आंदोलन प्रसंगी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली तसेच सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे तात्काळ लक्ष देण्याची मागणी करण्यात आली. वाढती महागाई नियंत्रणात आणावी, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती कमी कराव्यात आणि जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी आंदोलन कर्त्यांनी केली. प्रसंगी उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, गटप्रमुख, महिला पदाधिकारी तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व पदाधिकाऱ्यांनी व शिवसैनिकांनी एकजुटीने सहभागी होत महागाईविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

### खव्याच्या बॅगांमुळे परिसरात दुर्गंधी

खोडद (स. गांवकरी) : पुण्यातील शिरूर तालुक्यातील शिरसगाव काटा येथे नुकतीच धक्कादायक घटना समोर आली आहे. राज्यभर सुरू असलेल्या अन्न भेसळविरोधी मोहिमेच्या धास्तीमुळे व दंडात्मक कारवाईच्या भीतीने एका व्यक्तीने तब्बल ३५० किलो खवा रस्त्याच्या कडेला फेकून दिला, ज्यावरून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा संशय आहे. अन्न व औषध प्रशासनाचे राज्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे भेसळखोरांमधे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, छापांच्या धास्तीनेच हा खवा टाकून दिला गेला असावा, अशी जोरदार चर्चा परिसरात सुरू आहे. शिरसगाव काटा येथील राष्ट्रीय महामार्ग ५४८- डी लगत असलेल्या शेतकरी विजय वामन काटे यांच्या गट क्रमांक ६ मधील शेताशेजारील कॅनॉल रस्त्याच्या कडेला अज्ञात व्यक्तींनी खव्याच्या १४बॅगा टाकून दिल्या. प्रत्येक बॅगेचे वजन सुमारे २५ किलो असल्याने एकूण खव्याचे वजन अंदाजे ३००ते ३५० किलो इतके असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. बुधवारी सकाळी परिसरात तीव्र दुर्गंधी पसरल्याने विजय काटे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यावेळी रस्त्यालगत खाव्याच्या बॅगांचा मोठा ढीग पडलेला दिसून आला. खव्याची झालेली नासाडी त्यातून येणारा उग्र वास आणि त्याची स्थिती पाहता हा माल दोन ते तीन दिवसांपूर्वी येथे फेकण्यात आला असावा ,असा प्राथमिक अंदाज स्थानिकांनी व्यक्त केला आहे. स्थानिक नागरिकांनी या प्रकारची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्न भेसळीसारख्या गंभीर प्रकारांमुळे नागरिकांच्या आरोग्याची थेट खेळ होत असल्याने प्रशासनाने या प्रकारचा तपास करून सत्य बाहेर आणावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### विधानपरिषद निवडणुकीत दिलीप सोपलांची एंट्री?



सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर जिल्हासोलापू विधानपरिषद निवडणुकीत आता आमदार दिलीप सोपल यांची एंट्री होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण, काँग्रेसचे उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांचा उमेदवारी अर्ज बाद झाल्यानंतर निवडणुकीची सूत्रे हाती घेत राष्ट्रवादीचे (शरद पवार) खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह पक्षातील वरिष्ठ नेते सक्रिय झाले आहेत. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माजी मंत्री तथा आमदार दिलीप सोपल यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून बैठकीसाठी निमंत्रण दिल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, नागेश अक्कलकोटेंचा उमेदवारी अर्ज हाही सोपल यांचाच खो असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. भाजप उमेदवार राजेंद्र राऊत यांच्यासमोर आव्हान उभे करण्यासाठी बुधवारी दिवसभर बैठका आणि चर्चांचे सत्र सुरू होते. राष्ट्रवादीचे उमेदवार वसंत देशमुख, उद्धवसेनेचे नेते तथा अपक्ष उमेदवार धनंजय डिकोळे, दिलीप सोपल समर्थक अपक्ष उमेदवार नागेश अक्कलकोटे तसेच राष्ट्रवादीचे आमदार उत्तमराव जानकर यांचे सुपुत्र आणि जीवन जानकर यांच्यापैकी एका उमेदवाराची उमेदवारी कायम ठेवून उर्वरित उमेदवारांनी माघार घ्यावी, अशी रणनीती बैठकीत आखण्यात आल्याचे समजते. मोहिते-पाटील यांच्या पुढाकारातून रात्री उशिरापर्यंत विविध स्तरांवर बैठका सुरू होत्या. आमदार उत्तमराव जानकर, आमदार दिलीप सोपल तसेच खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यात याच अनुषंगाने दिवसभर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती लोकमत वृत्तपत्राने दिली आहे.

# बिलोलीत कृषी विभागाच्या आशीर्वादाने खतांची टंचाई

बिलोली : (स. गांवकरी)

खरीप हंगाम अगदी तोंडावर आला असून बळीराजा शेतीच्या मशागती पूर्ण करून पेरणीच्या पूर्वतयारीत व्यस्त आहे. मात्र, ऐन पेरणीच्या तोंडावर बिलोली कृषी आशीर्वादाने शहरातील कृषी सेवा केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांची मोठी आर्थिक पिळवणूक आणि फसवणूक सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अत्यंत आवश्यक असणारे रासायनिक खते डीएपी, युरिया, २०:२०:१३, पोटॅश आणि दर्जेदार बी-बियाणे, औषधे यांची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना लुटले जात असल्याची तक्रार प्रशासनाकडे दाखल झाली आहे. या प्रकाराची तालुक्यात खळबळ उडाली असून कृषी विभागाच्या भोंगळ कारभारावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. शहरातील काही पांढरपेशी आणि प्रतिष्ठित समजले जाणारे



कृषी सेवा केंद्र चालक शेतकऱ्यांच्या अज्ञानपनाचा गैरफायदा घेत आहेत. अनेक शेतकरी अशिक्षित व कायद्याच्या ज्ञानापासून दूर असल्याने, त्यांना खते व बियाणे देताना मूळ किमतीची (एमआरपी) पावती दिली जाते. मात्र, प्रत्यक्षात त्यांच्याकडून छापील किमतीपेक्षा कितीतरी पटीने अधिक पैसे उकळले जात आहेत. शेतकऱ्यांच्या हक्काचे खत देताना उद्दामपणा आणि अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचे बोलल्या जात आहे. जवळील नातेवाईक किंवा परिचित व्यक्तींचे आधारकार्ड जमा करून, त्यांच्या नावे खत विक्री दाखवायची आणि तेच खत चढ्या दराने काळ्या बाजारात विकायचे, अशी नवी शक्कल काही दुकानदारांनी लढवली असल्याची धक्कादायक चर्चा सध्या तालुक्यात रंगत आहे. या प्रकाराची सखोल चौकशी केल्यास मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महाराष्ट्राचा हक्काचा खतसाठा शेजारील तेलंगणात लंपास करून तेलंगणात काळाबाजार केला जातोय.

बिलोली तालुका हा आंध्र-तेलंगणा सीमेलगत असल्याने याचा गैरफायदा घेऊन काही नफेखोर दुकानदार तालुक्यातील गरजू शेतकऱ्यांसाठी आलेला हक्काचा डीएपी आणि युरियाचा साठा छुप्या मार्गाने तेलंगणा राज्यात पाठवून तिथे त्याची बेकायदेशीर आणि अनाधिकृतपणे चढ्या दराने विक्री केली जात आहे. यामुळे बिलोली परिसरात खतांची तीव्र कृत्रिम टंचाई निर्माण झाली असून, स्थानिक शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे किंवा दुप्पट दाम मोजावे लागत आहेत. या संपूर्ण गोरखधंद्याबाबत यापूर्वीही शेतकऱ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेकदा तोंडी व लेखी तक्रारी केल्या होत्या.

# ६१ वर गावांचे दिशादर्शक बोर्ड लावा : पांडुरंग पवार

निमगाव सावा : (स. गांवकरी)

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरून जाताना जुन्नर तालुक्यातील अनेक गावांमध्ये जाण्यासाठी दिशादर्शक बोर्ड नसल्याने बाहेरगावच्या नागरिकांची व ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे महामार्गालगत सर्व गावांचे नाव व अंतर दर्शवणारे बोर्ड तातडीने लावावेत, अशी मागणी पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे (NHAI) केली आहे. यासंदर्भात श्री.पवार यांनी NHAI च्या अहिल्यानगर येथील प्रकल्प संचालक मा. श्री. वाबळे साहेब यांना लेखी निवेदन दिले आहे. राष्ट्रीय महामार्ग ६१ वरील जुन्नर तालुक्यातील पेमदरा, नळवणे, आनंदवाडी, पळसपुर, शिंदेवाडी, बांगरवाडी, गुंजाळवाडी, तांबेवाडी, उंचखडक, जाधववाडी,



निमगावसावा, बोरी बुद्रुक, संतवाडी, कोळवाडी आदी महसुली गावे व ग्रामपंचायती हायवेपासून काही अंतरावर आहेत. मात्र, महामार्गावर या गावांकडे जाण्यासाठी कोठेही दिशादर्शक फलक लावलेले नाहीत. "बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांना, नातेवाईकांना तसेच नवीन वाहनचालकांना गावाचा फाटा नेमका कुठे आहे हेच समजत नाही. अनेकदा चुकीच्या ठिकाणी वळून वेळ व इंधन वाया जाते.

# सोलापुरात निवडणुकीत राजकारण रंगले

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी भाजपकडून माजी आमदार प्रशांत परिचारक हे इच्छुक होते परंतु भाजपने त्यांना डावलून बार्शी चे राजेंद्र राऊत यांना उमेदवारी दिली आहे त्यामुळे पंढरपूर माळशिरस मोहोळ कुर्डुवाडी मंगळवेढा हे सर्व तालुके एकत्र येत बाहेरचा नको पंढरपूर चा स्वाभिमान हवा असे म्हणत कॅम्पेन सुरू केले आहे त्यामुळे सोलापूर चे राजकारण रंगले असून भाजपा ला हि निवडणूक जड जाणार अशी चिन्हे दिसू लागली आहेत. सोलापूर विधापरिषदेची निवडणूक ही केवळ एका जागेपुरती मर्यादित नसून, ती पंढरपूरच्या पुढील काही वर्षांतील विकासाची दिशा ठरवणारी आहे.सध्या पंढरपूर मधून वसंतनाना देशमुख आणि महेश नाना साठे यांचे अर्ज वैध ठरले आहेत.. पहील नाव वसंतनाना देशमुख हे पंढरपूरच्या राजकारणातील आणि समाजकारणातील एक अत्यंत आदरणीय व ज्येष्ठ नाव आहे. नानांनी अनेक वर्षे तळागाळातील लोकांशी संपर्क ठेवून काम केलय..नाना हे



प्रशासनातील प्रत्येक विषयाची खडानखडा माहिती असणारे व्यक्तिमत्व आहे.. आणि दुसरे अपक्ष उमेदवार महेश नाना सदा तत्पर नेता म्हणून ओळख असणारे,जनतेच्या सुखादुःखात धावून जाणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात . तरुण वर्ग आणि सर्वसामान्य जनतेमध्ये त्यांच्याबद्दल मोठी आपुलकी आहे. राजेंद्र राऊत हे बार्शीचे आहेत.त्यांचे कार्यक्षेत्र आणि प्राधान्य साहजिकच त्यांच्या भागाला राहील. अशा वेळी पंढरपूर,मंगळवेढा,सांगोला, माढा,मोहोळ, माळशिरस,येथील मतदारांनी आपल्या हक्काच्या माणसाला निवडून देणे गरजेचे आहे. आणि विशेष म्हणजे गेली काही वर्षे सोलापूर जिल्ह्यावर होत असलेला अन्याय आणि बाहेरच्या नेतृत्वाची होणारी लुडबुड या गोष्टींचा बदला घेण्याचीही वेळ आलीय.

# उपवर्गीकरणासाठी मंत्रालयावर धडकणार लाँगमार्च

बिलोली : (स. गांवकरी)

■ महापदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी राहण्याचे आवाहन

अनुसूचित जाती आरक्षण लाभ वंचित किंवा लाभधारक समूहाचे उपवर्गीकरण करण्याविषयी (दि ०६ जुलै ) पर्यंत मुंबई मंत्रालयावर लॉंगमार्च धडकणार असून .यासाठी येत्या ११ जूनपासून धर्माबाद ते मुंबई अशी आरक्षण उपवर्गीकरण संघर्ष न्याय महापदयात्रा ( लॉंगमार्च)काढण्यात येणार आहे. तरी बिलोली, धर्माबाद तालुक्यासह जिल्ह्यातील समाज बांधवानी या आरक्षण लढ्याच्या पदयात्रेत मोठ्या संख्यने सहभागी होऊन आंदोलनाची ताकत वाढवावी असे आवाहन ( दि.२ )मे रोजी बिलोली येथे मातंग समाज कार्यकर्ता बैठकी दरम्यान लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. रामचंद्र भरांडे यांनी केलं आहे. गेल्या ३५ वर्षांपासून महाराष्ट्रात अनुसूचित जाती लाभ वंचित किंवा लाभधारक समूहाला (अ,ब) वर्गवारीनुसार आरक्षण उपवर्गीकरणाचा लढा लोकस्वराज्य आंदोलनाने लावून धरला आहे,या लढ्याच्या अनुषंगाने



महाराष्ट्र सरकाने आनंद बदर समिती स्थापित केली होती, त्यानुसार समितीने आपला आहवाल १६ मार्चाला सरकारकडे सादर केला असून या समितीवरच्या हरकती ३० एप्रिल पर्यंत मागविल्या होत्या,परंतु या हरकतीचीही कालावधी संपूष्टात आली असून आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बदर समितीचा अहवाल मंत्रीमंडळासमोर ठेऊन अनुसूचित जातीच्या १३ % टक्के आरक्षणा पैकी अप्रगत समूहाला (अ ) मध्ये टाकून त्यांना ६ % टक्के आरक्षण द्या, आणि प्रगत समूहाला (ब ) मध्ये समाविष्ट करून त्यांना उर्वरित आरक्षण देऊन लाभ वंचित समूहाला समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी (अ,ब) उपवर्गीकरणाचा कायदा लागू करावा यासाठी २७ एप्रिलपासून आजद मैदानावर वज्रमुठ महाआंदोलन सुरु आहे. परंतु याकडे सरकार दुर्लक्ष होत आहे. म्हणून येत्या ११ जूनपासून महाराष्ट्रातून महापदयात्रा काढण्यात येत आहे.

विशेषतः अनुसूचित जाती (एससी) आरक्षण उपवर्गीकरण म्हणजे विद्यमान आरक्षणाचे समन्यायी वाटप करण्यासाठी विविध जातींच्या गटांमध्ये विभाजन करून वंचितांना लाभ मिळून देणे,याबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या ऑगस्ट २०२४ मधील

ऐतिहासिक निर्णयानंतर, महाराष्ट्रात ५९ अनुसूचित जातींच्या १३% आरक्षणाचे अ, ब, क, ड गटांमध्ये उपवर्गीकरण करणे असे न्यायालयाच्या निर्देशानंतर महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्यासाठी अभ्यास अहवाल तयार केला आहे.परंतु या उपवर्गीकरणाच्या निर्णयावर दलित समाजात या प्रक्रियेस काहीकडून विरोध होत आहे.म्हणून येत्या ०६ जुलै पर्यंत मुंबई मंत्रालयावर सरकारकडून न्याय मिळेपर्यंत लॉंगमार्च मोर्चा सुरु ठेवण्यात येणार असून यासाठी येत्या ११ जूनपासून धर्माबाद ते मुंबई महापदयात्रा (लॉंगमार्च) काढण्यात येत आहे. तरी या सामाजिक संघर्ष लढ्यात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलनाची ताकत वाढवावी. असे आवाहन बिलोली येथे मातंग समाज कार्यकर्ता बैठकी दरम्यान प्रा. रामचंद्र भरांडे यांनी केले आहे.यावेळी नगरसेवक राजू कुडके,गंगाधर भंडारे,देवराव गाडेकर, सुर्यकांत गायकवाड, आनंद रुमाले, विलास माळगे, नागोराव कुडके, गंगाधर सिंदलोन, सदानंद शिंदे, संजय हवगारे,सतीश कुडके, गंगाधर भंडारे, , हणमंत शिंदे, मारोती दुमटकर, बालाजी यलगंद्रे, प्रशांत कटारे, शेषराव जेठे, आनंदा दुमटकर, साहेबराव गायकवाड, यांच्यासह आदी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# रेट कार्डद्वारे उपचार करणाऱ्या सैलानी बाबा दर्ग्यातील भोंदू बाबा विरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर : (स. गांवकरी)

रेट कार्ड द्वारे उपचार करणाऱ्या सैलानी बाबा दर्ग्यातील भोंदू बाबा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून भोंदू बाबा ला अटक करून त्याच्या मालमत्तेची चौकशी केली जाणार आहे. लातूर दि.लातूर पासून जवळच खोपेगाव शिवारात सैलानी बाबा दरबार देवस्थान असून तेथे मारुती चंदनराव मोरे नावाचा भोंदूबाबा सर्व प्रकारच्या दुर्धर, असाध्य रोगावर सैलानी बाबाची दुवा आणि तंत्र मंत्राच्या जोरावर लोकांना अंगारे धुपारे, पेट्या बांधून गोरगरीब भक्तांना सैलानी बाबाच्या दुवा देऊन अर्थपूर्ण फसवत असल्याचे दिसून आल्यामुळे त्याच्या विरोधात महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक उच्चाटन




व अध्यादेश 2013 कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, लातूर शाखेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी धोका पत्करून, पूर्ण सावधगिरी बाळगून औसा रोड, खोपेगाव शिवारातील सैलानी बाबा दरबारात दरबाराच्या दिवशी जाऊन भोंदूबाबा मारुती महाराज मोरे बुवाबाजीच्या माध्यमातून तो असाध्य रोगावर करीत असलेले दैवी तोडगे, उपाय, उपचार याबाबत खात्री केली. त्याने जे दावे केलेले आहेत ते अचंबित करणारे आहेत. मी तुमच्या सर्व समस्या खात्रीशीर पणे दूर करू शकतो, अगदी दवाखान्यातून विलाज होत नाही म्हणून पाठवलेल्या पेशंटला देखील मी उभे केले आणि त्याच्या पायावर चालत घरी पाठवले आहे. अत्यंत दुर्धर असाध्य रोगांवरही माझ्याकडे विलाज होतो, कोणाच्या कुटुंबात बेबनाव असेल किंवा कोणाच्या व्यवसायात बरकत येत नसेल तर मी त्या सर्व समस्यावर बाबाच्या दुवा आणि माझ्या मंत्र शक्तीच्या जोरावर उपाय करू शकतो असे सांगत होता. लोकांना समोर बसवून एक धातूची छोटी ताबीज पेटी गळ्यात घालण्यासाठी किंवा दंडावर बांधण्यासाठी देत होता व त्या बदल्यात 1151, 1551, 2151रुपये घेत होता. त्याच्याकडे एक रेटकार्डही होते त्या कार्डवर आजाराप्रमाणे दर दिलेले होते. एखाद्या महिलेला मुलगा पाहिजे असेल तर सैलानी बाबाला फेरी मारून ये म्हणून सांगायचा व पोटावर हात फिरवुन म्हणायचा तुला मुलगा होईल व त्या बदल्यात देणगी स्वीकारायचा. काही लोकांना तेल प्यायला व चोळायला द्यायचा, लोकांना डोक्यावर व पोटावर लिंबू कापायला सांगायचा, त्याचेही वेगळे पैसे घ्यायचा. अशा पद्धतीने तो लोकांची आर्थिक पिळवणूक व मानसिक शोषण करत असे. याचे पुरावे म्हणून आम्ही कार्यकर्त्यांनी ऑडिओ व्हिडिओ बोलणे रेकॉर्ड केलेले आहेत.

या भोंदूबवावर कारवाई व्हावी म्हणून महा.अंनिस च्या वतीने 14 मे 2026 रोजी ग्रामीण पोलीस स्टेशन, बाभळगाव रोड, लातूर येथे खबरी अर्ज केला होता, या अर्जाची दखल घेऊन ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी स्वतः फिर्यादी होऊन एक जून 2026 रोजी जादूटोणा विरोधी कायदा 2013 नुसार गुन्हा नोंद क्र. 106/2026 नुसार गुन्हा नोंद करून घेतला. यावेळी अतिरिक्त पोलीस निरीक्षक डोंगरे साहेब, सहाय्यक पोलीस निरीक्षक मोरे साहेब व इतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

महा.अंनिसच्या वतीने राज्य अध्यक्ष माधव बावगे, राज्य प्रधानसचिव रुकसाना मुल्ला, राज्य सरचिटणीस उत्तरेश्वर बिराजदार, जिल्हा कार्याध्यक्ष दशरथ भिसे, जिल्हा प्रधानसचिव सुधीर भोसले, बुवाबाजी विरोधी संघर्ष सहकार्यवाह दगडूसाहेब पडिले, डॉक्टर गणेश गोमारे आणि समाधानताई माने या पदाधिकाऱी, कार्यकर्ते, समविचारी कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवून पाठपुरावा केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,

# आनंदगड शैक्षणिक संकुल

आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर



२५ रौप्यमहोत्सवी वर्ष
वर्ष १९९९-२०२४

पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!

(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)

DTE Code 5480

## मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी

| | डी फार्मसी | बी फार्मसी |
|---|---|---|
| पात्रता | १२ वी पास (PCB / PCM) | १२ वी पास (PCB / PCM & CET) |
| कालावधी | २ वर्ष | ४ वर्ष |
| प्र.क्षमता | ६० विद्यार्थी | ६० विद्यार्थी |

विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!

- संपर्क -
7709203202
9421190696 I 9689758321

ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा

## धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल अँण्ड ज्युनिअर कॉलेज

के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)

अत्यल्प फी
सर्वोत्कृष्ट शिक्षण



आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा

- संपर्क -
9158077688
7875074070 I 9975276670

## आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज

पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved

DTE Code 05662

- सिव्हिल इंजिनिअरिंग 60
- मॅकॅनिकल इंजिनिअरिंग 60
- कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
- इलेक्ट्रिकल अँण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
- आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अँण्ड मशीन लर्निंग 60

- संपर्क -
9209645837 I 9922545516
9765431168 I 7028724045 I 9922161686



महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ ॲक्युपंक्चर,मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -

Anandgad Virgaon

## मातोश्री गंगुबाई शिंदे ॲक्यूपंक्चर कॉलेज अँण्ड हॉस्पिटल

डिप्लोमा इन ॲक्युपंक्चर थेरपी (DAT)

| | |
|---|---|
| प्रवेश क्षमता | ५० विद्यार्थी |
| डिप्लोमा कालावधी | २ वर्षे |
| शैक्षणिक पात्रता | इ. १२ वी पास |

सुविधा
- सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व ॲक्युपंक्चरिस्ट
- ॲक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
- वसतिगृह सुविधा उपलब्ध

- संपर्क -
9011271729
9834719663 I 7028724045

॥.सुजाता॥ अकोले 9970095289